# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१.
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट ३६०-२२ दिनांक २८/११/२०२२

## मोबाईल फोन चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक करुन ८ मोबाईल हॅन्डसेट हस्तगत.

दिनांक २५/११/२०२२ रोजी फिर्यादी राजकुमार प्यारेलाल शुक्ला वय-४६ वर्षे रा- भाईंदर-पुर्व हे त्यांच्या फर्निशिंगचा व्यवसाय असलेल्या शॉप नं-०२, चिंतामणी बिल्डिंग, आर. एन. पी. पार्क, भाईंदर-पुर्व येथे दुकानात असतांना त्यांनी त्यांचा मोबाईल फोन हा चार्जिंगसाठी लावला असताना सुमारे-१५.०० वा एक अनोळखी इसम त्यांच्या दुकानात आला व फिर्यादी यांनी चार्जिगसाठी ठेवलेला रुपये-२०००/- किंमतीचा मोबाईल फोन चोरी करुन घेवुन जात असताना फिर्यादी यांनी त्यास पाहिले असता त्यांनी त्याला पकडले व पोलीस ठाणेस घेवुन आले. त्यानंतर फिर्यादी यांनी सदर चोरी करणारा इसम नामे-वरुण सुनिल राणे रा-श्रीपाद आर्केड, जी.सी.सी क्लबजवळ, मिरारोड, ठाणे याचे विरोधात नवघर पोलीस ठाणे येथे तक्रार दिल्याने गुन्हा रजि. नं. I ९१७/२०२२ भा.दं.वि.सं.कलम-३८० प्रमाणे दि-२५.११.२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर आरोपी यास दिनांक २६/११/२०२२ रोजी अटक करुन त्याच्याकडे पोलीस कस्टडी दरम्यान कौशल्यपुर्ण अधिक तपास केला असता त्याने मिरा-भाईंदर परिसरात वेगवेगळया कंपनीचे एकुण-१० मोबाईल फोन चोरी केले असल्याचे सांगुन त्यातील एकुण-०६ मोबाईल फोन ३९,५००/- किंमतीचे असा संपुर्ण मुददेमाल हस्तगत करण्यात आलेला असून गुन्हयाचा अधिक तपास पोहवा-०७१६२/सुरेश चव्हाण हे करीत आहे.

त्याचप्रमाणे फिर्यादी कु. शितल अमरजित जैयस्वाल रा-भाईंदर-पुर्व या दिनांक २३/११/२०२२ रोजी लोकमान्य विदयालय, नवघर रोड, भाईंदर-पुर्व, ठाणे येथुन त्यांचे घरी इंद्रलोक फेज-०६ येथे जात असताना सुमारे-१२.४५ वा त्या पायी चालत राज वैभव बिल्डिंग, इंद्रलोक फेज-०६, भाईंदर-पुर्व येथे आल्या. त्यावेळी त्या फोनवर बोलत सदर ठिकाणाहुन जात होत्या. त्यावेळी त्यांच्या पाठीमागुन दोन अनोळखी इसम मोटार स्कुटरवरुन आले व त्यांनी फिर्यादीच्या हातातील मोबाईल फोन खेचुन जबरी चोरी करुन घेवुन गेले. सदर घटनेबाबत नवघर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. I ९१५/२०२२ भा.दं.वि.सं.कलम-३९२, ३४ प्रमाणे दिनांक २५.११.२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील आरोपीतांचा शोध होणेकामी तपास पथकाने माहिती प्राप्त केली असता फिर्यादी यांचा मोबाईल फोन जबरीने चोरी करणारे दोन अनोळखी इसम हे अंदाजे २० ते २५ वर्ष वयोगटातील व त्यांनी काळया रंगाच्या मोटारस्कुटरचा वापर केला असल्याचे समजून आले. त्यानुसार रामदेव पार्क, कनाकिया रोड, गोल्डन नेस्ट, गोल्डन नेस्ट ते इंद्रलोक रोड, गोडदेवगाव, शिर्डीनगर-भाईंदर-पुर्व या परिसरात तपास करुन सदर आरोपी यांचा शोध घेतला असता तपासाअंती नमुद गुन्हयातील सहभागी आरोपी नामे ओम विक्रम सोळंके रा-भाईदर-पुर्व व अमन संजय सिंग वर्षे रा-मिरारोड-पुर्व यांना नमुद गुन्हयात दिनांक २६/११/२०२२ रोजी अटक करुन त्यांच्याकडे पोलीस कस्टडी दरम्यान तपास केला असता त्यांनी नमुद गुन्हयातील फिर्यादी यांचा चोरी केलेला मोबाईल फोन व इतर १ असे दोन मोबाईल फोन व गुन्हयात वापरलेली मो/स्कुटर असा एकुण-६०,०००/- किंमतीचा संपुर्ण मुददेमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउनि-अभिजित लांडे हे करीत आहे.

सदरची कामगिरी श्री जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, डॉ. शशीकांत भोसले, सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, श्री सुशीलकुमार शिंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि/योगेश काळे, पोउनि/अभिजित लांडे, पोह-

०७०९७/भुषण पाटील, पोह-०४००४/गणेश जावळे, पोह-०७१६२/सुरेश चव्हाण, पोह-१२०१८/नवनाथ घुगे, पोह-०००२०/जयप्रकाश जाधव,पोशि-१३११८/ओंकार यादव, पोशि-१३०७८/सुरजसिंग घुनावत, पोशि-१७०४६/विनोद जाधव यांनी केलेली आहे.

--------------ooooo--------------